# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail – dy.registrar.tau@fort.mu.ac.in

Teaching Appointments & Approval Section ( TAAS )
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

क्र./अनिवि/आयसीडी/२०२०–२१/141

परिपत्रक :–

विषय:– राज्य शासकीय कर्मचारी यांना दिनांक १ जुलै, २०२० रोजीच्या वार्षिक वेतनवाढीच्या अनुज्ञेयाबाबत...

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांचे/संस्थांचे विभागप्रमुख/संचालक, प्राचार्य, सर ज.जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र, रत्नागिरी/ठाणे/कल्याण उपकेंद्र, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय अंबाडवे, ता. मंडणगड जि. रत्नागिरी यांना कळविण्यात येते की, उपरोक्त विषयाबाबतचे क्र. वेतन – ११२० प्र.क्र.२६/२०२०/सेवा–३ दिनांक २ जुलै, २०२० रोजी वित्त विभाग महाराष्ट्र शासन यांनी निर्गमित केलेले शासन निर्णय महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २४ जुलै, २०२० रोजी झालेल्या बैठकीत बाब क्र. ११ अन्वये सदर शासन निर्णयात नमूद केलेल्या तरतूदी विद्यापीठाच्या आस्थापनेवरील कार्यरत स्थायी शिक्षक कर्मचाऱ्यांना (शासनमान्य व स्वयंअर्थसहाय्यीत) यांना लागू करण्यासाठी मान्यतेकरिता ठेवण्यात आले होते. त्या अनुषंगाने विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेने पुढीलप्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांसाठी दिनांक १ जुलै, २०२० रोजीच्या वार्षिक वेतनवाढीच्या अनुज्ञेयतेबाबत शासन निर्णय क्र. वेतन – ११२० प्र.क्र.२६/२०२०/सेवा–३ दिनांक २ जुलै, २०२० स्विकारण्यात आला. त्या अनुषंगाने विद्यापीठ आस्थापनेतील स्थायी शिक्षक (शासनमान्य व स्वयंअर्थसहाय्यीत) व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना दिनांक दिनांक १ जुलै, २०२० रोजीच्या वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील."

तरी सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, सदर बाब विद्यापीठाच्या आस्थापनेवर कार्यरत असणाऱ्या सर्व स्थायी शिक्षक (शासनमान्य व स्वयंअर्थसहाय्यीत) यांच्या निर्दशनास आणावे, हि विनंती. सदर शासन निर्णयाची प्रत माहितीकरिता सोबत जोडण्यात येत आहे.

मुंबई : ४०० ०३२
दिनांक : 25 सेप्टेंबर, २०२०

(डॉ. विनोद पाटील)
प्रभारी कुलसचिव

ne - 022 – 2265 2816
mail – dy.registrar.tau@fort.mu.ac.in

Teaching Appointments &
Approval Section ( TAAS )
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32



प्रति,

विद्यापीठातील सर्व शैक्षणिक विभागांचे/संस्थांचे विभागप्रमुख/संचालक, प्राचार्य, सर ज. जी. वास्तुशास्त्र महाविद्यालय, प्रभारी संचालक ज्ञानस्त्रोत केंद्र, रत्नागिरी/ठाणे/कल्याण उपकेंद्र, समन्वयक, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी आदर्श महाविद्यालय, तळेरे, ता. कणकवली, जि. सिंधुदुर्ग, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श महाविद्यालय अंबाडवे, ता. मंडणगड जि. रत्नागिरी.

*****

प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना:—

१. विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता
२. वित्त व लेखा अधिकारी
३. उपकुलसचिव/सहायक कुलसचिव, वेतन कक्ष
४. उपकुलसचिव/सहायक कुलसचिव, निवृत्तीवेतन कक्ष
५. सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग
६. कुलगुरूंचे स्वीय सहायक
७. प्र—कुलगुरूंचे स्वीय सहायक
८. कुलसचिवांचे स्वीय सहायक

TAAS(UT)/C3/E-drive/Sadhana2020/September

राज्य शासकीय कर्मचारी यांना
दि. ०१ जुलै,२०२० रोजीच्या वार्षिक
वेतनवाढीच्या अनुज्ञेयते बाबत.....

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय, क्रमांकः वेतन -१९२० /प्र.क्र.२६ /२०२०/सेवा- ३
खो.क्र.३३५ (विस्तार), तिसरा मजला, मंत्रालय,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
तारीख : ०२ जुलै, २०२०.

वाचा-

१) महाराष्ट्र नागरी सेवा ( रजा) नियम १९८१ मधील नियम क्र ७०
२) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील नियम क्र.२८
३) महाराष्ट्र नागरी सेवा ( वेतन ) नियम १९८१ मधील नियम क्र ३६ व नियम क्रमांक ३९
४) महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारीत वेतन ) नियम २०१९ मधील नियम क्र.१०
५) वित्त विभाग, शासन निर्णय, क्र.वेतन-१०१०/प्र.क्र.३८/सेवा-३, दि.२६.१२.२०११.

प्रस्तावना -

कोविड-१९ महामारीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अंतर राखून अत्यावश्यक शासकीय कामकाज पार पाडण्याच्या अनुषंगाने शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीचे नियमित करणेबाबत शासनाने वेळोवेळी आदेश निर्गमित केलेले आहेत. त्याबरहुकूमच राज्य शासकीय कर्मचाऱ्याने कार्यालयात हजर राहणे अभिप्रेत आहे तर उर्वरीत कर्मचाऱ्यांनी घरात राहून शासकीय कामकाज करावयाचे आहे. त्यामुळे दि. ०१ जुलै, २०२० या तारखेस राज्य शासकीय कर्मचाऱ्यांपैकी काही कर्मचारी, आदेशित केल्यानुसार, कार्यालयात हजर राहणार असून उर्वरीत कर्मचाऱ्यांना आदेशित केले नसल्याने ते कार्यालयात हजर राहणार नाहीत.

महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारीत वेतन ) नियम- २०१९, नियम क्रमांक १० अन्वये विहीत तरतुदीनुसार, ज्या शासकीय कर्मचाऱ्यांची दि. ०१ जुलै ह्या तारखेपूर्वी सहा महिने इतकी अर्हताकारी सेवा पूर्ण झाली आहे व जे दि. ०१ जुलै ह्या तारखेस कर्तव्यावर हजर आहेत, अशाच कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै रोजीची वार्षिक वेतनवाढ, अनुज्ञेय ठरणार आहे.

वरील पार्श्वभूमीवर राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै, २०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ, कशाप्रकारे अनुज्ञेय करता येईल ही बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याबाबत सांगोपांग विचार करून पुढील प्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

शासन निर्णय:

जे राज्य शासकीय कर्मचारी शासनाने जाहीर केलेल्या टाळेबंदीच्या (Lock Down) कालावधीत शासनाने आदेशीत केल्यानुसार कार्यालयात हजर राहिले आहेत अथवा ज्यांनी घरात राहून शासकीय कामकाज पार पाडले आहे व ज्यांची दि. ३० जून ह्या तारखेस किमान सहा महिन्यांची अर्हताकारी सेवा पूर्ण होत आहे, अशा कर्मचाऱ्यांना दि. ०१ जुलै रोजीची वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

जे राज्य शासकीय कर्मचारी हे शासनाने जाहीर केलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत शासनाने आदेशीत केल्यानुसार, दि. ३० जून पर्यंत कर्तव्यावर हजर राहिले नाहीत, असे कर्मचारी कर्तव्यावर हजर झाल्यानंतर त्यांची दि. ३० जून, २०२० पर्यंत ६ महिन्यांची अर्हताकारी सेवा पूर्ण होत असल्यास, त्यांना हजर झाल्याच्या तारखेस वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहील.

जे राज्य शासकीय कर्मचारी शासनाने जाहीर केलेल्या टाळेबंदीच्या कालावधीत शासनाने आदेशीत केल्यानुसार दि. ३० जून पर्यंत कर्तव्यावर हजर राहिले नाहीत, मात्र त्यांनी त्यांची कार्यालयीन अनुपस्थिती ही यथास्थिती अर्धवेतनी / परावर्तित /अर्जित / विनावेतन ( कोणतीही रजा शिल्लक नसल्याने) मंजूर करण्याबाबत, निवेदने सादर केली आहेत, अशा कर्मचाऱ्यांना वेतनी रजा मंजूर करणे शक्य, असल्यास, तसेच त्यांची दि. ३० जून पर्यंत किमान सहा महिने अर्हताकारी सेवा पूर्ण होत असल्याची खात्री करून मगच त्यांना कर्तव्यावर हजर राहिल्याच्या दिनांकापासून वार्षिक वेतनवाढ मंजूर करावी.

जे कर्मचारी दि. ०१ जुलै, २०१९ पासून दि. ३० जून, २०२० पर्यंत ६ महिने किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय असाधारण रजेवर आहेत व ज्यांची दि. ३० जून, २०२० पर्यंत ६ महिन्यांची अर्हताकारी सेवा पूर्ण होत आहे त्यांना दि.०१ जुलै, २०२० रोजी वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय ठरेल. तसेच जे कर्मचारी दि. ०१ जुलै, २०१९ पासून दि. ३० जून, २०२० पर्यंत ६ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय असाधारण रजेवर आहेत, त्यांना दि. ०१ जुलै, २०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय ठरणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००७०२१५४२२८०८०५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

INDRAJEET SAMBHAJI GORE

(इंद्रजित गोरे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

| | |
|---|---|
| मा. राज्यपालांचे सचिव<br>मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव<br>सर्व मा. मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव<br>मा.विरोधी पक्ष नेता, विधान परिषद / विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई<br>सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य<br>मंत्रालयीन सर्व विभाग<br>सर्व अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव/सचिव मंत्रालय, मुंबई | निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई<br>सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,<br>लेखा अधिकारी, वेतन पडताळणी पथक, मुंबई/नागपूर/पुणे/औरंगाबाद.<br>विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,<br>ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२. |

सचिव, मा.सभापती, विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई
सचिव, मा.अध्यक्ष, विधान सभा, विधानमंडळ, मुंबई
मंत्रालयीन सर्व विभागाच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख
# प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा),मुंबई.
# प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा),मुंबई.
#सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.
# सचिव,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
#प्रबंधक,लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय,मुंबई.
#मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई
# आयुक्त राज्य माहिती आयोग,(सर्व)
# सचिव राज्य निवडणूक आयोग,मुंबई.
# प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई/नागपूर/ औरंगाबाद.
महासंचालक, यशदा, राजभवन आवार, बाणेर रोड, पुणे
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषदा.
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, नागपूर
सिनियर रिसर्च ऑफिसर, पे-रिसर्च युनिट, भारत सरकार, वित्त मंत्रालय, (व्यय विभाग), खोली क्र.२६१, नॉर्थ ब्लॉक, नवी दिल्ली,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई
उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी हिशेब,मुंबई/पुणे/ नागपूर /औरंगाबाद/ नाशिक /अमरावती.
# पत्राने

बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई १
भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं. १, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक,नरिमन पॉईंट , मुंबई २०
भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४,राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड,मुंबई ४
भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई १३
इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई २५
नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई २१
शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई २८
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती, वित्त विभाग (सेवा-३)